रक्तदान जिवनदान

महाराष्ट्र शासन

# शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, जळगाव

## Government Medical College & Hospital, Jalgaon

Jilhapeth, Government Hospital Campus, Jalgon- 425001, M.S. (INDIA)

Telephone & Fax No. 0257- 2232390 Email- deangmcjalgaon@gmail.com

जा. क्र. शावैमरुज/भांडार-ब/जैविक कचरा विल्हेवाट/सुधारीत/२२, 1918-23 दि. 16/6/२०२२

कार्यालयीन आदेश (सुधारीत)

प्रति,

मे. मन्साई बायोमेडीकल वेस्ट एंटरप्रायझेस प्रा.लि.

हिरापन्ना अपार्टमेन्ट, १ ला मजला, प्लॉट नं. १,

पांडे डेअरी चौकाजवळ, ओंकारनगर, जळगाव.

विषय :- या संस्थेत निर्माण होणारा जैविक कचरा विल्हेवाट लावणेबाबत....

संदर्भ :- १) मा. जिल्हाधिकारी, जळगाव यांचे आदेश क्र. दंडप्र-०१/कावि/२०२१/८६१, दि. १९/०७/२०२१

२) आपले दिनांक २६/०७/२०२१ रोजीचे पत्र.

३) समितीचे दिनांक १२/०८/२०२१ रोजीचे इतिवृत्तांत.

४) जिल्हा शल्य चिकीत्सक, सामान्य रुग्णालय, जळगाव यांच्यासोबत आपला दि.०७/०४/२०१६ रोजी केलेला करारनामा.

५) कार्यालयीन आदेश क्र. शावैमरुज/भांडार-ब/जैविक कचरा/८५६६-७१/२१, दि. ०५/१०/२०२१

६) आपले दिनांक २६/११/२०२१ रोजीचे पत्र.

७) जैविक कचरा विल्हेवाट लावणेबाबतच्या समितीचे दि. १८/०५/२०२२ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्तांत

उपरोक्त संदर्भीय विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, संदर्भ क्र. १ च्या आदेशान्वये मा. जिल्हाधिकारी, जळगाव हे रुग्णालय दिनांक २२/०७/२०२१ रोजीपासुन नॉन कोव्हिड रुग्णालय घोषीत केलेले आहे.

तत्पुर्वी हे रुग्णालय कोव्हिडं रुग्णालय असल्यामुळे कोव्हिड-१९ या विषाणुची लागण झालेल्या रुग्णापासुन निर्माण होणारा जैविक कचरा उचलणेकरिता आपणास आदेश देण्यात आलेले होते. तरी संदर्भ क्र. १ अन्वये मा. जिल्हाधिकारी यांनी हे रुग्णालय नॉन कोव्हिड रुग्णालय घोषीत केलेले आहे. त्यामुळे आपणास नॉन कोव्हिड रुग्णापासुन निर्माण होणारा जैविक कचरा उचलणेकरिता सुधारीत आदेश निर्गमित करणे क्रमप्राप्त आहे. तरी आपणास सुधारीत आदेश निर्गमित करणेकरिता व आपण संदर्भ क्र.२ अन्वये विनंती केल्याप्रमाणे या संस्थेत जैविक कचरा (बायोमेडीकल वेस्ट) समितीची दि. १२/०८/२०२१ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीमध्ये समितीने संदर्भ क्र. ३ अन्वये जिल्हा शल्य चिकीत्सक, सामान्य रुग्णालय, जळगाव यांनी संदर्भ क्र. ४ अन्वये आपणासोबत केलेल्या करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार संदर्भ क्र. ५ अन्वये जैविक कचरा विल्हेवाट लावणेबाबतचे आदेश निर्गमित करण्यात आले होते. परंतु सदर आदेशाबाबत आपण संदर्भ क्र. ६ च्या पत्रान्वये मुद्दे उपस्थित केलेले आहे. तरी सदरच्या मुद्याच्या अनुषंगाने जैविक कचरा विल्हेवाट लावणेबाबत गठीत करण्यात आलेल्या समितीची बैठक बोलावुन सदर बैठकीमध्ये समितीच्या सदस्यांनी सदर मुद्याबाबत चर्चा करुन संदर्भ क्र. ७ अन्वये सुधारीत आदेश निर्गमित करणेबाबत शिफारस केलेली आहे.

आदेश

संदर्भ क्र. ७ अन्वये जैविक कचरा व्यवस्थापन समितीने शिफारस केल्याप्रमाणे या संस्थेतील जैविक कचरा विल्हेवाट लावणेबाबत संदर्भ क्र. ५ च्या आदेशास खालील अटी व शर्तीनुसार पुढील आदेश निर्गमित होईपर्यंत जैविक कचरा विल्हेवाट लावणेबाबत संदर्भ क्र. ४ अन्वये झालेल्या करारनाम्याच्या अटी व शर्तीनुसार सुधारीत आदेश निर्गमित करण्यात येत आहे.

१) जिल्हा शल्य चिकीत्सक, सामान्य रुग्णालय जळगाव यांचेसोबत दि. ०७/०४/२०१६ रोजी झालेल्या करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार या संस्थेतील जैविक कचरा उचलणेबाबत आपणास बंधनकारक राहील.

२) या संस्थेत एकुण ४५६ रुग्ण खाटा (बेड) असुन त्यापैकी १६ खाटाचे (बेडचे) जुने आयसियु हे कोव्हिड रुग्णाकरिता राखिव ठेवण्यात आलेले आहे. त्यामुळे आपणास कोव्हिड कक्षाचा जैविक कचरा हा वजनानुसार (किलोप्रमाणे) उचलणे बंधनकारक राहील.

३) उर्वरीत ४४० खाटा (बेड) पासुन निर्माण होणा-या जैविक कच-याची हे प्रति खाट (बेड) प्रति दिवस या प्रमाणे रु.०६.६५ या दराने व प्रतिवर्षी १० टक्के दरवाढ करण्याच्या अटीवर विल्हेवाट लावणे आपणास बंधनकारक राहील.

४) प्रति खाट (बेड) प्रति दिवस या प्रमाणे दि. ०७/०४/२०१६ रोजी रु. ०६.६५ या दराने करारनामा झालेला आहे. त्यामुळे आपण प्रति खाट (बेड) प्रति दिवस वाढीव १० टक्के रक्कम ही दि. ०१/०४/२०१७ रोजीपासुन पुढील प्रत्येक वर्षी १ एप्रिल पासुन कार्यालयात सादर करण्यात येणा-या देयकात वाढवुन द्यावी.

५) कार्यालयात देयक सादर करताना अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, जळगाव या नावाने तीन प्रतीत देयक सादर करावे.

६) देयक सादर करताना कोव्हिड कक्षाचे देयक (वजनानुसार) व उर्वरीत खाटाचे देयक असे वेगवेगळे सादर करावे.

७) अनुदान उपलब्धतेनुसार देयक अदा केले जाईल. अनुदानाअभावी देयक वेळेत अदा करण्यात आले नाही. तर त्याबाबत व्याजाची मागणी करता येणार नाही अथवा अदा केले जाणार नाही.

८) कोव्हिड कक्षापासुन निर्माण होणा-या जैविक कच-याची नोंद ही वैद्यकीय अधिक्षक यांनी स्वतत्रपणे ठेवावी.

९) कोव्हिड कक्षातील जैविक कचरा हा पिवळया रंगाच्या पिशवीत ठेवण्यात यावा.

१०) उर्वरीत कक्षातील (कोव्हिड कक्ष वगळुन) निर्माण होणारा कचरा विल्हेवाट लावणेकरिता केंद्रींय प्रदुषण नियंत्रण मंडळ, नवी दिल्ली यांच्या मार्गदर्शक सुचनानुसार निरनिराळया रंगाच्या (काळया, निळया, पिवळया व लाल) पिशव्याचा वापर करावा.

११) सदर आदेश हे संदर्भ क्र. ५ च्या आदेशास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

(डॉ. जयप्रकाश रामानंद)
अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,
जळगाव.

प्रत :- मा. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांना माहीतीस्तव.

प्रत:- प्राध्यापक व विभाग प्रमुख, जनऔषधवैद्यकशास्त्र विभाग, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जळगाव.

प्रत :- वैद्यकीय अधिक्षक, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, जळगाव यांना माहीती व पुढील कार्यवाहीस्तव अग्रेषित.

प्रत:- लेखा अधिकारी, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,

प्रत :- कोषागार अधिकारी, कोषागार कार्यालय, जळगाव.

भारतीय गैर न्यायिक

एक सौ रुपये **Rs. 100**

रु. 100 ONE HUNDRED RUPEES

भारत INDIA

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ● 2015 ● NH 08954

29 MAR 2016

# करारनामा

करारनामा लिहून देणार - मनसाई बायोमेडीकल वेस्ट एंटरप्रायजेस प्रा.ली.जळगांव
हिरापन्ना अपार्टमेंट, १ ला माळा, पांडे चौक, जळगांव
जिल्हा जळगांव.

CIVIL HOSPITAL JALGAON

करारनामा लिहून घेणार - जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रूग्णालय, जळगांव.

Jalgaon

सामान्य रूग्णालय, जळगांव व अंतर्गत कार्यरत असणाऱ्या उपजिल्हा तसेच ग्रामीण रूग्णालयातील टाकाऊ जैविक वैद्यकिय कचऱ्याची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावण्यासाठी

महाराष्ट्र राज्य प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत. त्यानुसार रूग्णालयातील जैविक वैद्यकिय कचऱ्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावण्यासाठी मन्साई बायोमेडीकल वेस्ट एंटरप्रायजेस प्रा.ली.जळगांव यांचेकडून सदर करार करण्यात आलेला आहे. जिल्हा रूग्णालयात एकूण ४७२ बेड (खाटा) आहेत तसेच उपजिल्हा रूग्णालय चोपडा येथे १०० बेड, तसेच उपजिल्हा रूग्णालय जामनेर व मुक्ताईनगर येथे प्रत्येकी ५० बेड, व उर्वरीत सर्व ग्रामीण रूग्णालये प्रत्येकी ३० बेड असे एकूण ११८२ बेड (खाटा) हे आज रोजी उपलब्ध असुन त्यास प्रति बेड / प्रति दिवस रूपये - ८.६५ पैसे या दराने टाकाऊ जैविक वैद्यकिय कचऱ्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावण्यासाठी दर आकारणी केली जाईल. तसेच करार झाल्यापासून दरवर्षी १० टक्के दरवाढ केली जाईल.

मन्साई बायोमेडीकल वेस्ट एंटरप्रायजेस प्रा.ली.जळगांव आणि जिल्हा शल्य चिकित्सक सामान्य रूग्णालय, जळगांव यांचे मध्ये आज दिनांक ०७ / ०४ / २०१६ रोजी करारनामा करण्यात येत आहे.

खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून हा करारनामा राजीखुशीने करून देण्यात येत आहे. सामान्य रूग्णालय जळगांव, तसेच उपजिल्हा व ग्रामीण रूग्णालये येथील जैविक वैद्यकिय कचऱ्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट करतांना खालील अटी व शर्तीचे पालन करण्यास तयार आहोत.

१) सदर करार अमलात आल्याचे दिनांकापासून एम पी सी बी च्या निदर्शनानुसार जैविक कचऱ्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावण्याची जबाबदारी ही मन्साई बायोमेडीकल वेस्ट एंटरप्रायजेस प्रा.ली. जळगांव यांची राहील.

२) सदर जैविक कचरा हा कंपनीने रूग्णालयातुन नेल्यानंतर एम पी सी बी च्या निर्देशाच्या वेळेत (४८ तास) शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावण्याची जबाबदारी कंपनीची राहील.

३) भविष्यात जर एम पी सी बी (महाराष्ट्र राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई / महाराष्ट्र राज्य) ने काही नविन नियम लागू केल्यास त्या नियमानुसार कंपनीला जैविक कचऱ्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावणे बंधनकारक राहील.

४) मन्साई बायोमेडीकल वेस्ट एंटरप्रायजेस प्रा.ली. जळगांव यांच्या जैविक कचरा शास्त्रोक्त पद्धतीने एम पी सी बी च्या नियमानुसार वेळेत होते आहे किंवा नाही यांची पडताळणी जिल्हा शल्य चिकित्सक, अति जिल्हा शल्य चिकित्सक, निवासी वैद्यकिय अधिकारी (चि.) निवासी वैद्यकिय अधिकारी (बा.रु), वरिष्ठ स्वच्छता निरीक्षक किंवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी ही कोणत्याही वेळेस येउन पाहणी करतील. कामकाज असमाधानकारक आढळल्यास योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

५) या जिल्हा रूग्णालया अंतर्गत कार्यरत उपजिल्हा रूग्णालये (३) व ग्रामीण रूग्णालये (१७) यांची संपूर्ण जैविक वैद्यकिय कचरा शास्त्रोक्त पद्धतीने वाहतूक करून शास्त्रोक्त पद्धतीने नष्ट करणे बाबत जबाबदारी आपली राहील.

६) तसेच कंपनीने विविध प्रकारचा जैविक वैद्यकिय कचरा वाहतूक करून जाळून नष्ट करण्याचा संपुर्ण अहवाल या कार्यालयास व सर्व संबंधीत यंत्रणांना सादर करणे बंधनकारक राहील.

७) मासिक देयकां हे उचललेल्या व नष्ट केलेल्या जैविक वैद्यकिय कचऱ्याच्या मासिक अहवाला त्या कार्यालयाकडून उपलब्ध अनुदानातून देयके अदा केले जातील.

८) रुग्णालयाकडून जैविक वैद्यकिय कचरा वाहतूक करतांना एम पी सी बी ने दिलेल्या मार्गदर्शक सुचनेनुसार जैविक वैद्यकिय कचरा वाहणे बंधनकारक राहील.

९) रुग्णालयाने एम पी सी बी च्या सुचनेनुसार जैविक वैद्यकिय कचरा हा लाल व पिवळ्या रंगाच्या पिशवीत वेगवेगळा करून ठेवणे बंधनकारक राहील.

१०) तसेच करार झाल्याचे तारखेपासुन हा करारनामा या पुढील (१५) पंधरा वर्षासाठी लागु राहील.

११) सर्व अटी व शर्ती शासन निर्णयानुसार तसेच न्यायालयीन मार्गदर्शक सुचना किंवा निर्णय वेळोवेळी होणारे बदल हे बंधनकारक राहतील.

वरील सर्व अटी व शर्ती आम्हाला मान्य असून त्या आम्हावेर बंधनकारक आहेत.

ठिकाण :- जळगांव

दिनांक :- ०७/०४/२०१६

| करारनामा लिहून घेणार | करारनामा लिहून देणार |
|---|---|
| जिल्हा शल्य चिकित्सक, | मनसाई बायोमेडीकल वेस्ट एंटरप्रायजेस |
| CIVIL SURGEON, JALGAON | Manasai Biomedical Waste Ent. Pvt. Ltd. |
| सामान्य रुग्णालय, जळगांव | प्रा. ली. जळगांव |

CIVIL HOSPITAL JALGAON सत्यमेव जयते

साक्षीदार

१)

सही :-

नाव :-

२)

सही :-

नाव :-